महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मौजे शिरवणे ता. व जि.ठाणे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याबाबत

(१) २६२६ (२२-१२-२०१४). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरवणे ता.व जि.ठाणे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे दिनांक ३० मे, १९८९ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, शिरवणे येथील ३५.०५ हेक्टर जमीन एम.आय.डी.सी. ने सिडकोला तुल्यत: हस्तांतरीत करण्यास व बदलण्यास सरतोळे, छाल व पनवेल येथील जमीनीच्या बदल्यात हस्तांतरीत केली आहे काय तसेच दिलेल्या अटीनुसार सदर जमिनीचा वापर होतो काय,

(३) असल्यास, सदर अश्याप्रकारे अधिकार एम.आय.डी.सी. ला आहेत काय, नसल्यास, संबंधित जमीन परत घेणार काय,

(४) असल्यास, संबंधीतावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

शासनाच्या दिनांक ३०/५/१९८९ च्या आदेशान्वये मौजे शिरवणे येथील ३५.०५ हे. क्षेत्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे (सिडको) हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(२) मौजे शिरवणे येथील ३५.०५ हेक्टर जमिनीच्या बदल्यात सिडकोकडून मौजे सारसोळे येथील १० हेक्टर, मौजे पनवेल येथील २.०० हेक्टर व मौजे छाल, ता.पनवेल येथील ३९.४० हेक्टर अशा एकूण ५१.४० हेक्टर जमिनीचा ताबा महामंडळास प्राप्त झाला आहे. कुकशेत गावाची वस्ती मे.हर्डिलिया कंपनीच्या जवळ असल्याने प्रदूषणाचे दृष्टीकोनातून कुकशेत गावाचे स्थलांतर मौजे सारसोळे येथे करण्यात आले असून मौजे पनवेल येथील २.०० हेक्टर क्षेत्रावर महामंडळाचे कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच मौजे छाल येथील ३९.४० हेक्टर क्षेत्र

मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड यांच्या नांवे हस्तांतरीत करण्यात आले असून सद्यस्थितीत सदर प्रकल्प कार्यान्वित आहे.

(३) शासनाच्या दिनांक ३०/५/१९८९ च्या आदेशान्वये ३५.०५ हेक्टर क्षेत्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे (सिडको) हस्तांतरीत करण्यात आले असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वरोरा औद्योगिक विकास केंद्रासाठी (जि.चंद्रपूर) पाणी पुरवठा योजनअंतर्गत बॅरेजचे बांधकामाची चौकशी करण्याबाबत

(२) ८६५९ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा औद्योगिक विकास केंद्रासाठी (जि.चंद्रपूर) पाणी पुरवठा योजनअंतर्गत २१ दलघमी क्षमतेचे बॅरेजचे बांधकामाची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ६ जानेवारी, २०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त होताच पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा ब्राम्हणवाडा थडी ता.चांदूर बाजार येथे कर्ज बाजारी आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या वारसांना मृत्यु पश्चात मिळालेल्या अनुदानातून कर्ज कपात केल्याबाबत

(३) १०२९४ (०९-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, ब्राम्हणवाडा थडी ता.चांदूर बाजार येथे कर्ज बाजारी आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या वारसांना मृत्यु पश्चात मिळालेल्या अनुदानातून कर्ज कपात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या बाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे,

(३) सदरहू बाब नियमबाहय असल्यास याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) होय, चौकशीमध्ये कोणतीही नियमबाहय बाब आढळून आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या औद्योगिक वसाहतीतील अनेक भूखंड वापराविना पडून असल्याबाबत

(४) १३९५३ (१०-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उद्योग प्रोत्साहन देण्यासाठी कानाकोप-यात औद्योगिक क्षेत्रे स्थापन करण्यावर एमआयडीसीने भर दिला होता सदरहू उद्योगक्षेत्रे निर्माण करण्यासाठी शेतक-यांच्या जमिनीही संपादीत करण्यात आल्या होत्या त्या जमिनीवर उद्योगाचे जाळे उभारणे अपेक्षित होते परंतू प्रत्यक्षात औद्योगिक वसाहतीतील अनेक भूखंड मोकळेच असून वर्षानुवर्षे वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ज्या भूखंडधारकांना करारनाम्यात केलेल्या अटी व शर्तीनुसार विहीत कालावधीत राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचा विकास केला नाही, अशा ३७३४ भूखंडधारकांना नोटीस देण्यात आल्या असून त्यापैकी ११०३ भूखंड आजपर्यंत महामंडळाने ताब्यात घेतले आहेत. उर्वरित भूखंड धारकांना नोटीशी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील स्थानिक जमिन मालकांच्या मागण्या पूर्ण न झाल्याबाबत

(५) १८४०१ (३१-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील करजुवे व आजुबाजूच्या गावच्या हद्दीतील

तिसंगवाडी ते दुर्गवलेवाडी या भागातून गेल इंडिया कंपनीची गॅस पाईपलाईनचे काम पूर्ण होऊन सुमारे तीन वर्षे होऊनही कंपनीने स्थानिक जमिन मालकांच्या मागण्या अद्याप पूर्ण केल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाईपलाईन टाकताना पाडण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालय व स्वच्छतागृहाची पुर्नबांधणी झालेली नसणे, खोदाईत नादुरुस्त झालेल्या पूर्वापार नाल्यांवर कॉक्रिटिंग झालेले नसणे, खोदाईवेळी काढण्यात आलेली माती संपादित जमिनीच्या लगतच्या शेतात टाकल्यामुळे शेतीचे झालेले नुकसान याची भरपाई न मिळाल्याने शेतकरी संतप्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी तसेच सक्षम प्राधिकारी, गेल इंडिया लि., बेलापूर यांचकडे वारंवार पत्रव्यवहार करुन तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) करजुवे पंचक्रोशी शिक्षण संस्थेस संपादित केलेल्या .०३ हेक्टर आर क्षेत्राची झाडे, जमीन व बांधबंधीस्ती यांची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.तसेच संस्थेच्या स्वच्छतागृहांच्या बांधकामाचा निवाडा दिनांक १४/८/२०१५ रोजी करण्यात आला असून तीन खोल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच नुकसान भरपाईच्या वाटपाची रक्कम रु.३,४३,६४८/- वाटपासाठी पाठविण्यात आली आहे.

(३) व (४) संगमेश्वर तालुक्यातील करजुवे व आजूबाजूच्या तिसंगवाडी ते दुर्गवलेवाडी येथील खातेदारांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही झालेली आहे.संबंधित गावातील एकूण २४७ खातेदारांच्या जमिनीतून गॅस पाईप लाईन गेली असून त्यापैकी २०० खातेदारांना नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात आली असून ४७ शेतकऱ्यांना त्यानी अंतर्गत वादामुळे संमतीपत्र सादर न केल्यामुळे नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात आलेली नाही तथापि संमतीपत्र प्राप्त होताच नुकसान भरपाई देण्याची तजवीज करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहातील असुविधांबाबत

(६) १९५०८ (३०-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात राहणा-या मुलींना निकृष्ट दर्जाचा आहार, अपु-या सोयी सुविधा व शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थीनींवर होणारा अन्याय अशा अनेक कारणांमुळे वसतिगृहातील मुली असुरक्षित झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहात राहणा-या मुली मानसिक दबावाखाली असल्याने त्यांच्यावर शैक्षणिकदृष्टया विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात समाजकल्याण आयुक्तांनी हस्तक्षेप करुन वसतिगृहातील समस्या सोडवून विद्यार्थीनींना न्याय द्यावा अशी मागणी विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे का,
(४) असल्यास, सदर वसतिगृहाची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२८-०१-२०१६) : (१) नाही.

शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांबाबत शासन निर्णय दि.२६.०७.२०११ नुसार सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) येथील मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात राहणाऱ्या मुलींना नाष्टा, भोजन, निर्वाह भत्ता, गणवेश भत्ता, स्टेशनरी भत्ता इत्यादी सोयी सुविधा नियमितपणे देण्यात येत आहेत.

तसेच सदर वसतिगृहामध्ये बाह्यस्त्रोताद्वारे महिला चौकीदार नियुक्त करणेत आल्याने प्रवेशित विद्यार्थिनी सुरक्षित आहेत.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील औद्योगिक विकासास चालना देण्याबाबत

(७) १९६०० (०६-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर तालुक्याचा (जि.रत्नागिरी) औद्योगिकदृष्ट्या विकास व्हावा यासाठी युती सरकारच्या काळात १९९६ साली भुमिपूजन झालेल्या संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील लघु औद्योगिक वसाहतीस १९ वर्षे उलटूनही अद्यापी उद्योग उभारण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक विकासास चालना द्यावी व तालुक्यातील हजारो बेकारांना रोजगार मिळवून द्यावा अशी मागणी तालुकावासियांकडून होत आहे, हे खरे अहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील साडवली (देवरुख) येथील एकूण १४.९५ हे.जमिन लघु औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित केली असून त्यामध्ये एकूण ७१ औद्योगिक भूखंड आरेखित करण्यात आले आहेत.सर्व भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यामधील १० भूखंडांवर उत्पादन सुरु असून १६ भूखंडांवर बांधकाम सुरु आहे.१० भूखंडांचा विकास कालावधी शिल्लक असून उर्वरित ३५ भूखंडधारकांचा विकास कालावधी संपुष्टात आल्याने त्याना नोटीसा देण्यात आल्या होत्या.सदर नोटीसांच्या अनुषंगाने भूखंडधारकानी व उद्योजकांच्या संघटनानी केंद्र सरकारच्या पर्यावरण व वन विभागाकडून नवीन प्रकल्पांसाठी ऑगस्ट २०१० मध्ये स्थगिती देण्यात आलेली असून Environment Clearance शिवाय संमतीपत्र देता येणार नसल्याचे महाराष्ट्र प्रदेश नियामक मंडळाकडून कळविल्याने व मा.गाडगीळ कमिटी आणि कस्तुरीरंगन समितीने,पश्चिम घाट पर्यावरणदृष्टया संवेदनशील असल्याने तेथे उत्खनन, खाणी, वाळू इत्यादीस मनाई करण्यात आल्यामुळे विहीत कालावधीत भूखंडांचा विकास करता आला नाही असे कळविले.त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव पारित करुन अशा भूखंडधारकांना नवीन सुधारित विकास कालावधी अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

ज्या भूखंडधारकांचा विकास कालावधी संपलेला आहे अशा उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली असून भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात घेऊन गरजू उद्योजकांना भूखंड वाटप करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.त्यामुळे उद्योगधंद्यांना चालना मिळून रोजगार निर्मिती होईल.

संगमेश्वर तालुक्यातील साडवली (देवरुख) येथील औद्योगिक क्षेत्रातील एकूण ३५ भूखंडधारकांना करारनाम्यातील अटीनुसार भूखंड विकासाचा कालावधी संपलेला होता. त्यावेळी २६ भूखंडधारकांना ठराव पास करुन सुधारीत विकास कालावधी लागु करण्यात आला होता. उर्वरीत ९ उद्योजकांचा विकास कालावधी हा केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाकडून नवीन प्रकल्पासाठी २० ऑगस्ट २०१० पूर्वी दिलेल्या मुदतीत संपत असल्यामुळे त्यांचे भूखंड ताब्यात घेऊन गरजू उद्योजंकाना भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खोपोली (ता.खालापूर, जि. रायगड) येथील शेतकऱ्यांच्या शेतातून रिलायन्सची गॅस लाईन जात असल्याबाबत

(८) १९८३३ (३१-०७-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (ता.खालापूर, जि. रायगड) शेतकऱ्यांच्या शेतातून रिलायन्सची गॅस लाईन जात असल्याने तेथील शेतकऱ्यांचा विरोध असल्याने दिनांक ४ एप्रिल, २०१५ रोजी धामणी येथे जनसुनावणी झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जनसुनावणीमध्ये कोणते आक्षेप नोंदविण्यात आले व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण व नियंत्रण मंडळाकडून दिनांक ४/४/२०१५ रोजी धामणी येथे जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती.

(२) सदर जनसुनावणीमध्ये संबंधीत शेतकऱ्यांनी खालील प्रमाणे आलेल्या आक्षेप नोंदविलेले होते.

१. रिलायन्सची गॅसची पाईपलाईन टाकल्यामुळे जमिनीच्या किमंती कमी होतील.
२. शेतकऱ्यांना व परिसरातील लोकांना रोजगार देण्याची योजना नाही.
३. सदर प्रकल्पासाठी जात असलेल्या जमीनीच्या सातबारावर गावमंडळाचा शिक्का आहे. तो शिक्का काढून सातबारा कोरा करावा.
४. प्रकल्पासंदर्भात प्रत्येक तालुक्यात जनसुनावणी घेण्यात यावी.
५. सदर प्रकल्पासाठी पाईपलाईन टाकल्यामुळे झाडे तोडली जाणार आहेत त्यामूळे त्याच्या हानी संदर्भात कंपनीने काय व्यवस्था केली आहे.
६. सदर कंपनीत झालेल्या फायद्यातून गावामध्ये पाण्याची टाकी बघावी.
७. सदर प्रकल्पसाठी बाधीत झालेल्या सर्व जमीनधारकांना प्रकल्पग्रस्त दाखला द्यावा व नुकसान भरपाई एक रक्कमी न देता मासीक नुकसान भरपाई दिली जावी.

महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळाकडून जनसुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या मुद्दयांची नोंद घेऊन इतिवृत्त तयार करण्यात आले असून सदर इतिवृत्त जनसुनावणीच्या अहवालासोबत पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळाकडून पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रानसई (ता.उरण,जि.रायगड) येथील धरणातील गाळ काढण्याबाबत

(९) १९८४८ (१७-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानसई (ता.उरण,जि.रायगड) येथील धरणातील गाळ काढण्यासंदर्भातील लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना प्रत्यक्ष भेट देऊन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणातील गाळ काढण्यासंदर्भात एमआयडीसी ला आदेश देण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या धरणातील गाळ काढण्याकरीता किती कालावधी लागणार आहे तसेच त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना गाळ काढण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) रानसई धरणात गाळ साचला आहे किंवा कसे याची शहानिशा करण्याकरिता सर्वेक्षणाचे काम भारत सरकारच्या अखत्यारितील मे.सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन, पुणे या संस्थेस देण्यात आले असून त्यांनी दिनांक १९ फेब्रुवारी, २०१५ ते २८ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले असून सर्वेक्षणचे पृथ:करणाचे काम सुरु आहे. सदर संस्थेला अहवाल तात्काळ पाठविण्यासंदर्भात महामंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. संस्थेचा सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महामंडळातर्फे पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चक्रधर स्वामी विमुक्त/ भटक्या जमाती प्राथमिक आश्रमशाळेला वर्ग ८ ते १० (माध्य. शाळा), ची मान्यता देण्याबाबत

(१०) २०४४१ (३०-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.चक्रधर स्वामी विमुक्त/भटक्या जमाती प्राथमिक आश्रमशाळेला वर्ग ८ ते १० माध्य.शाळा-मेंढा-चदगड (ता. लाखांदूर जि.भंडारा) ची मान्यता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त बाबतीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१८-०१-२०१६) : (१) होय.
(२) दि.३१.०५.२००६ च्या शासन निर्णयान्वये विजाभजच्या आश्रमशाळांना मान्यता न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे व हे धोरण अद्यापही कायम आहे. तथापि उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खेड तालुक्यातील (जि.पुणे) सेझ च्या प्रस्तावित पुढील टप्प्यासाठी १३ गावांच्या शेतकऱ्यांच्या १६६७ हेक्टर जमिनीवर झालेल्या"भू संपादनासाठी प्रस्तावित" नोंदी रद्द करण्याबाबत

(११) २०५२९ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) सेझ च्या प्रस्तावित पुढील टप्प्यासाठी १३ गावांच्या शेतकऱ्यांच्या १६६७ हेक्टर जमिनीवर झालेल्या "भू संपादनासाठी प्रस्तावित" नोंदी रद्द करण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात एका बैठकीत देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे काय, कोणत्या गावांच्या नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत,

(३) अद्याप आश्वासनाची पूर्तता केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र.२ व ३ मधील १३ गावातील अधिसूचित क्षेत्र विना अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला असून प्रस्तुत क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे घोडबंदर येथील हनुमाननगर मध्ये मुस्लिम कब्रस्थानच्या बाजूला एमआयडीसीच्या जागेवर झालेले अतिक्रमण

(१२) २०७२६ (१०-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे घोडबंदर येथील हनुमाननगर मध्ये मुस्लिम कब्रस्थानच्या बाजूला एमआयडीसीच्या जागेवर अतिक्रमण केलेले असून याबाबतची तक्रारी ठाणे महानगरपालिका आणि एमआयडीसी यांच्याकडे करुनही अद्यापही कोणतीच कारवाई केली नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अतिक्रमण हटविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) व (२) घोडबंदर (जि.ठाणे) येथील देवी प्रभाग समितीमधील हनुमाननगर येथे कब्रस्तानच्या बाजूला वागळे औद्योगिक क्षेत्रातील महामंडळाचा मोकळा भूखंड क्र.ओएस-१६वर विट बांधकामाच्या भिंती बांधून त्यावर पत्रे टाकून

छत बांधण्याचे काम सुरु होते. अतिक्रमण होत असल्याची सूचना लोकप्रतिनिधी व नगरसेवक यांच्याकडून प्राप्त झाली होती. सदर अतिक्रमण महामंडळाच्या स्थानिक कार्यालयामार्फत दिनांक ११/५/२०१५ व दिनांक १०/६/२०१५ अन्वये नोटीस बजावून थांबविण्यात आले. त्यानंतर दिनांक ३०/६/२०१५ रोजी स्थानिक पोलिसांच्या मदतीने सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खालापूर (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीसाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकऱ्या देणेबाबत

(१३) २०९८५ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीसाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी स्वस्तात घेवून स्थानिक शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरीत घेण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकऱ्या देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये खाजगी जमिनीची भूसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येवून संपादित केलेल्या जमिनी महामंडळाकडे हस्तांतरीत केल्या जातात. तद्नंतर भूखंड आरेखित करून भूखंडांचे उद्योजकाना वाटप करण्यात येते त्यावेळी महामंडळ व उद्योजक यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यामध्ये उद्योजकाने सुरु करावयाच्या प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याची तरतूद करण्यात येते. तसेच महामंडळाकडून प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याची शिफारस उद्योजकांना करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

देऊळगाव राजा (जि.बुलडाणा) कृषी उत्पन्न बाजार समितीने भुसंपादन प्रक्रिया पूर्ण न करताच केलेल्या नियमबाह्य विकास कामाबाबत

(१४) २१०६० (०५-०९-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसंपादन प्रक्रिया पूर्ण न करताच देऊळगाव राजा (जि.बुलडाणा) कृषी उत्पन्न बाजार समितीने नियमबाह्य विकास कामे केली मात्र शेतकरी भुसंपादनाच्या फायद्यापासून वंचित

राहिला तथापि सदर बाजार समितीने बनावट दस्तऐवज सादर करुन कोट्यवधीचा निधी शासनाकडून मिळविण्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करावी अशी मागणी देऊळगाव राजा तालुक्यातील शेतक-यानी व नागरीकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) : (१) भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण झालेली नाही व सदर प्रक्रिया अद्याप सुरु आहे. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, बाजार समितीने बनावट दस्तऐवज तयार करुन कोटयावधी रुपयांचा निधी शासनाकडून प्राप्त केलेला नसून रितसर कार्यवाही करुन कॉटन टेक्नॉलॉजी मिशन प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून रु. १.३६ कोटी एवढे अनुदान प्राप्त केलेले आहे. तसेच नियमबाह्य विकासकामे केल्यामुळे शेतकरी वंचित राहिल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) होय.

(३) व (४) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी बाजार समितीसाठी आरक्षित केलेली जमीन, मा. उच्च न्यायालयाच्या व जमीन मालकाच्या सहमतीने बाजार समितीने संपादित केली आहे. याबाबत अभिलेख्यामध्ये नोंद करण्याची कार्यवाही बाजार समितीमार्फत सुरु आहे.तसेच जमीन मालकाला रु. ५ लाख इतका मोबदलाही देण्यात आलेला आहे. या व्यवहारामध्ये गैरप्रकार झाल्याचे चोकशीमध्ये निर्देशनास आले नाही.

अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना
देण्यात येणारी शिष्यवृत्ती शिक्षकांनी हडप केल्याबाबत

(१५) २११४७ (३०-०७-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्रसरकार कडून येणारी शिष्यवृत्ती विविध शिक्षकांनी हडप केली असल्याने मा.मुंबई, उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर, इथे रामटेक येथील सृष्टी बहुउद्देशिय संस्थेने याचिका दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थाचालक व समाजकल्याण अधिका-यांनी संगनमत करुन बोगस विद्यार्थ्यांच्या नावांवर शिष्यवृत्ती मध्ये गैरव्यवहार केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०३-०२-२०१६) : (१) मा.मुंबई, उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेली जनहित याचिका सृष्टी बहुउद्देशिय संस्थेने केलेली नसून दृष्टी बहुउद्देशिय संस्थेने केलेली आहे.

(२) व (३) सदर संस्थेने केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने शासनाची बाजू मा.उच्च न्यायालयास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नविन अग्निशामक स्थानकाची निर्मिती करणेबाबत

(१६) २१६६२ (१०-०८-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील म.रा.औ.वि.महामंडळ क्षेत्रात नविन अग्निशामक दलाची स्थापना करण्याबाबत वारंवार मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास रात्री खामगांव येथील मे.गुप्ता ऑईल इंडस्ट्रीजला आग लागल्यामुळे खामगांव, शेगांव, मलकापूर, जळगांव जामोद, बुलढाणा, अकोला या ठिकाणावरून अग्निशामक दलाच्या १५० ते २०० गाड्या मागवाव्या लागल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव म.रा.औ.वि.महामंडळाच्या क्षेत्रात नवीन अग्निशामक दलाची स्थापना करण्यात येणार आहे काय,

(४) सदर प्रस्ताव मंजूरीसाठी अग्निशामक विभाग म.रा.औ.वि.महामंडळ अंधेरी कार्यालयात प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) हे खरे नाही, अग्निशामक दल स्थापन करण्याबाबत खामगाव औद्योगिक क्षेत्रातील कोणत्याही उद्योजकांकडून मागणी प्राप्त करण्यात आलेली नाही.

(२) मुख्याधिकारी, नगर परिषद खामगांव यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार दिनांक १/५/२०१५ रोजी मध्यरात्री सुमारे २ वाजता खामगांव औद्योगिक क्षेत्रातील मे.गुप्ता ऑईल इंडस्ट्रीज, भूखंड क्रमांक ए-५२ व ५३ या उद्योग घटकाला आग लागल्यावर खामगांव नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाची ३ अग्निशमन वाहने व मलकापूर, जळगांव, बुलढाणा, अकोला, नांदुरा व शेगांव नगरपरिषदेचे प्रत्येकी १ अशी ९ वाहने वर्दीवर उपस्थित होती. त्यावेळी सदर अग्निशमन वाहनानी महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेंमार्फत पुरविण्यात येणाऱ्या योजनेतून पाण्यासाठी १६५ फेऱ्या मारल्या होत्या.

(३) खामगांव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांकडून अग्निशमनकेंद्र स्थापन करण्यासंबंधीची विनंती आल्यास व ते अग्निशमन सेवा केंद्र शुल्क भरण्यास तयार असल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अग्निशमनकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.
(४) खामगाव औद्योगिक क्षेत्रात अग्निशमनकेंद्र स्थापन करण्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी कार्यालयात प्रलंबित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय मुलांचे वसतिगृह, रामटेक येथे अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

(१७) २२३८२ (३०-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय मुलांचे वसतिगृह, रामटेक येथे एसटी नॉन प्लॅन हेड ऑफ अकाऊंड २२५-१२८६ चे अनुदान उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०२-०२-२०१६) : (१) होय.
(२) २२२५-१२८६ या लेखाशीर्षाखालील निधी आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त होतो. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून रु.०.४८ लाख अनुदान राष्ट्रीय मुलांचे वसतिगृह, रामटेक या वसतिगृहास वितरीत करण्यात आला आहे. तसेच कमी पडत असलेला निधी आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीच्या जागेवर वसलेल्या झोपड्यांसाठी एसआरए योजना प्रकल्प राबविण्याबाबत

(१८) २२९३५ (३१-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडिसी) मालकीच्या जागेवर अतिक्रमण करुन वसलेल्या झोपडयांसाठी एमआयडिसी यापुढे एसआरए (झोपु योजना) प्रकल्प राबविण्याच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडिसीने आपल्या अतिक्रमण झालेल्या भूखंडांच सर्वेक्षण केले आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय हे खरे आहे.

सन १९९५ पर्यंतच्या किंवा वेळोवेळी जाहिर होणाऱ्या शासन धोरणानुसार महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रातील जागेवर अनधिकृत झोपडयांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने महामंडळाने संचालक मंडळाच्या दिनांक २३/०२/२०१० रोजी झालेल्या ३३४ व्या बैठकीतील ठराव क्र. ४८९२ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास मंजुरी दिली आहे.

(२) महामंडळाने टि.टि.सी. व वागळे औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण केले असून उर्वरित औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टयांचे सर्वेक्षणचे काम प्रलंबित आहे.

(३) उक्त १ व २ संदर्भात वरील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास जिल्हाधिकाऱ्यामार्फत हस्तांतरीत करण्यात आलेल्या बहुतेक क्षेत्रावर आजपर्यंत अतिक्रमण झालेली होती. तसेच महामंडळ अतिक्रमणे झालेल्या क्षेत्रासंदर्भात वेळोवेळी पोलीस पथक मागवून अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील नवीन होणारी तसेच शासन निर्णयानुसार अपात्र असलेली अतिक्रमणे हटविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंजवडी राजीव गांधी इन्फोटेक पार्क मधील भूखंड ताब्यात घेतल्याबाबत

(१९) २३२९६ (३१-०७-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने वितरीत केलेल्या परंतु वर्षानुवर्ष विनावापर पडून असलेले भूखंड ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयांतर्गत हिंजवडी राजीव गांधी इन्फोटेक पार्क मधील ११ भूखंड ताब्यात घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संपूर्ण राज्यातील इतर एमआयडीसीचे विनावापर पडून असलेले भूखंड अद्याप ताब्यात घेण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय. हे खरे आहे.

औद्योगिक क्षेत्रातील वाटप केलेल्या भूखंडांवर उद्योग उभारणीकरिता औद्योगिक क्षेत्राच्य वर्गवारीनुसार भूखंड विकासाचा कालावधी देण्यात येतो. तथापि ज्या भूखंडधारकांनी विहीत मुदतीत भूखंड विकसित केला नाही. त्याच्याविरुद्ध करारनाम्यात नमूद केलेल्या अटीनुसार भूखंड परत घेण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) हिजवडी राजीव गांधी इन्फोटेक पार्क येथील ११ भूखंडधारकांनी करारनाम्यात विहीत केलेल्या अटीनुसार भूखंड विहीत कालावधीत विकसित केला नाही. त्यामुळे ६ भूखंडधारकानी स्वत: भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास परत केले आहेत व उर्वरीत ५ भूखंड महामंडळाने पंचनामा करुन ताब्यात घेतले आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राज्यात वाटप केलेल्या भूखंडापैकी ज्या भूखंडाधारकांनी करारनाम्याची अटीनुसार विहित मुदतीत भूखंड विकसीत केलेला नाही, अशा ३७३४ उद्योजकांना नोटीशी देऊन ११२६ भूखंड ताब्यात घेण्यात आलेले आहेत. उर्वरीत उद्योजकांना पुन्हा नोटीसा देऊन भूखंड परत ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांवपेठ औद्योगिक वसाहतीत सुवर्ण लघु उद्योग योजनेअंतर्गत भुखंड वाटप करण्याबाबत

(२०) २४०७० (३१-०७-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांवपेठ औद्योगिक वसाहतीत सुवर्ण लघु उद्योग योजनेअंतर्गत भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडावर विद्युत पुरवठा नसल्याने उद्योग कार्यान्वीत होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे सुवर्ण लघु उद्योग योजनेअंतर्गत २४ शेडचे बांधकाम करण्यात आले असून त्यापैकी एका शेडचे वाटप करण्यात आले आहे. सद्या वाटप करण्यात आलेल्या शेडमधील उत्पादन बंद आहे. उर्वरित २३ शेड जीर्ण स्थितीत असून उद्योजकांची मागणी नसल्यामुळे ते रिक्त आहेत.

(२) व (३) सुवर्ण लघुउद्योग योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या २४ शेडमध्ये महामंडळातर्फे रस्ते, वीज, पाणी इत्यादी मूलभूत सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चिकणी बाणायत ग्राम वि.वि. सोसा. र.नं. ४३८ या संस्थेने मौजे आमसेत येथील एका महिलेच्या नावावर पिक कर्जाची रक्कम परस्पर उचल केल्याबाबत

(२१) २४६०१ (१४-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती जयवंताबाई गणपत राठोड, रा.आमसेत (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील मौजे चिकणी बाणायत ग्राम वि.वि.सोसायटीकडून घेण्यात आलेल्या कर्जाची रक्कम दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत व्याजासह भरणा केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती जयवंताबाई राठोड यांनी नवीन कर्जाची मागणी केली नसतांनाही सोसायटीच्या सचिवाने परस्पर सदर महिलेचे नावे २५ मे, २०११ रोजी ५६ हजार ८०० रु.कर्ज मंजूर करुन त्याची उचलही करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर व्यक्तीच्या दोन्ही मुलांनी याबाबत बोरीअरब बॅक शाखेचे कार्यालयातील सचिव डी.के.इंगोले यांना माहितीच्या अधिकारात माहिती मागण्यास गेले असता त्यांना टाळाटाळ करुन त्यांना धमकाविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाबाबत सह. निबंधकाकडून संबधितावर कारवाई करण्यात आली तसेच जिल्हा बँकेने महिला शेतक-यांच्या बॅक खात्याची माहिती देण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) श्रीमती जयवंताबाई राठोड यांनी कर्जाची मागणी केलेली नाही. हे खरे नाही. त्यांनी अध्यक्ष/सचिव, चिकणी ग्रा.वि.का. सहकारी संस्था यांचेकडे दि.२१/०४/२०११ रोजीचा कर्ज मागणी अर्ज दिलेला आहे तसेच त्यांना कर्ज रक्कम रु. ५६,८०० दि.१९/०५/२०११ रोजी मंजूर करण्यात आली आहे. दि.२५/०५/२०११ रोजी कर्ज रु. ५५,७००/- एवढ्या कर्जाची उचल करण्यात आली, हे खरे आहे. श्रीमती जयवंताबाई राठोड यांच्या नावे दि.२५/०५/२०११ रोजीचे किसान पत पत्र चलन रु.५५,७००/- असून त्यावर श्रीमती जयवंताबाई राठोड यांचा अंगठा आहे.

(३) होय, श्रीमती जयवंताबाई राठोड यांनी माहीतीच्या अधिकारात सोसायटीच्या सचिवांस माहिती मागीतली असता सदर मागीतलेली माहिती सचिवांनी संबंधितास दिलेली नाही, हे खरे आहे. तथापि धमकाविण्यात आल्याची माहिती खरी नाही.

(४) होय, श्रीमती जयवंताबाई राठोड यांनी सोसायटीच्या सचिवांस माहितीच्या अधिकारात मागीतलेली माहिती सोसायटीच्या सचिवाने दिली नसल्यामुळे अर्जदार यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दारव्हा यांचेकडे अपिल दाखल केले होते तथापि सदर दस्तावेज बँकेकडे असल्याने, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दारव्हा यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनीयम १९६० चे कलम ३२ अंतर्गत संबंधितांना माहिती पुरवणेबाबत आदेशित केले तथापि बँकेने अर्जदार यांना माहिती दिली नाही.

(५) मा. राज्य माहिती आयोग, अमरावती येथे अर्जदार यांनी दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी झाली असून मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती यांचे आदेश क्र.६००२/१५, दि.२८/०८/२०१५ अन्वये अर्जदार यांनी मागणी केलेली माहीती ही व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा- बोरीअरब यांच्याकडे आहे. सदरची संस्था माहिती अधिकार अधिनियमांच्या तरतूदी अन्वये माहीती देण्यासाठी बाध्य नाही. यामुळे अर्जदार यांना बँकेशी संबंधीत माहीती देता येत नाही. यामुळे अर्जदार यांचे द्वितीय अपिल दि.१२/०२/२०१३ निकाली काढण्यात येत आहे. असे आदेश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

चंदनखेडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. चंदनखेडा च्या निवडणूक प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करणा-या सचिवास निलंबित करण्याबाबत

(२२) २४७२० (१४-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदनखेडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. चंदनखेडा च्या निवडणूक प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करणा-या सचिवास निलंबित करण्याबाबत मा.सहकार राज्यमंत्री यांनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी विभागीय सहनिबंधक, नागपूर यांचेकडे पाठवून चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार या प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सहायक निबंधक, सहकारी संस्था, भद्रावती यांनी दि.०५.०९.२०१५ रोजीच्या पत्राने अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांच्या कार्यालयास सादर करुन त्याची प्रत सहकार राज्यमंत्री व श्री.सुरेश धानोरकर, वि.स.स. यांना दिलेली आहे. सदर अहवालानुसार सागरा सेवा सहकारी संस्था मर्या. या संस्थेच्या सचिवाने चंदनखेडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. चंदनखेडा या संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कसदार जमिनी एमआयडीसीला देण्यास विरोध दर्शविल्याबाबत

(२३) २४८०१ (३१-०७-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कुपनलिका असलेल्या आणि कसदार जमिनी एम.आय.डी.सी.ला देण्यास विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहे व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

भुदरगड,शाहुवाडी,व अति.शिरोली येथील भूसंपादनाची कार्यवाही सुरु होती. तथापि खातेदारांचा विरोध असल्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्रे रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

करवीर औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून जमिनीच्या दराबाबत वाटाघाटी सुरु आहेत. अर्जुनी औद्योगिक क्षेत्रातील भूसंपादन कार्यवाही अंतर्गत सर्व खातेदारांना कलम ३२ (२) अन्वये व्यक्तीगत नोटीसा पाठविण्यात आल्या असून संयुक्त मोजणीच्या टप्प्यावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबड (जि.नाशिक)येथील एमआयडीसी लघु उद्योजकांसाठी बांधण्यात आलेल्या गाळ्यांची किंमत जास्त असल्याबाबत

(२४) २५०६० (०६-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.नाशिक) येथील एमआडीसी लघु उद्योजकांसाठी बांधण्यात आलेल्या गाळ्यांची किंमत खासगी विकासकापेक्षाही जास्त असल्याची तक्रार एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे भाजप उद्योग आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनानी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) श्री. प्रदीप पेशकार, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, भा.ज.पा. उद्योग आघाडी यांनी दि.२१/४/२०१५ रोजी मा. मंत्री (उद्योग) यांच्याकडे गाळ्याचा दर खाजगी विकासकापेक्षाही जास्त असल्याची तक्रार केलेली आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने खाजगी विकासकातर्फे गाळे बांधण्यासाठी निविदा मागविल्या होत्या तथापि श्री.पेशकार व इतर लघुउद्योजकांनी विरोध करुन गाळयांचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करावे अशी मागणी केल्यामुळे गाळे बांधण्याचे काम सुरु आहे. दरसुचीनुसार केलेले अंदाजपत्रक व खुल्या स्पर्धेतून मागविलेल्या निविदांमधील न्यूनतम दर आधार धरुन बांधीव गाळयांचा दर निश्चित केला आहे. तथापि गाळेविक्रीस प्रतिसाद न मिळाल्याने महामंडळाने गाळयांचा दर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत

(२५) २५११० (३१-०७-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या टप्पा क्र. २ मध्ये अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी महामंडळाने भूखंड आरक्षित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती एकर भूखंड आरक्षित करण्यात आला आहे व किती कालावधीत अग्निशमन केंद्राची उभारणी करण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चाकण टप्पा क्र.२ येथे अग्निशमन केंद्रासाठी ए.एम. ५४ हा ११९२८ स्क्वे.मी. चा भूखंड आरक्षित केला आहे. अग्निशमन केंद्र विकसित करण्याकरिता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर अग्निशमन केंद्र बांधण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा (ता.जि.जळगांव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अहवालात दोषी आढळून आलेल्या संचालकांवर कारवाई करण्याबाबत

(२६) २५४१० (०५-०९-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (ता.जि.जळगांव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सन २०१०-११ व २०११-१२ च्या लेखापरिक्षण अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मा. जिल्हा उपनिंबधक सहकारी संस्था, जळगांव यांच्या आदेश क्र.विकास १/कृउबास/पाचोरा/क्र.४० चौकशी/५८६५/१४ दि.१४.०८.२०१४ अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० अन्वये पाचोरा कृषी उत्पन्न बाजार समितीचा कामकाजाच्या चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही अहवालांची छाननी करण्यात आली आहे काय, या छाननीमध्ये काय आढळून आले,
(४) असल्यास, या अहवालात दोषी आढळून आलेल्या संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१६) : (१) व (२) होय.
(३), (४) व (५) बाजार समितीच्या संचालक मंडळाने काही बाबतीत मंजूर तरतूदींपेक्षा अधिक खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सन २०१०-११ च्या लेखापरिक्षणात आढळून आलेल्या अधिकच्या खर्चाची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पणन अधिनियमाच्या कलम ५७ (४) अन्वये एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्याबाबत जिल्हा उपनिबंध, सहकारी संस्था, जळगांव यांना दि. ७.१.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे. तसेच सन २०११-१२ संदर्भात पणन अधिनियमाच्या कलम ५३ अन्वये चौकशी सुरु आहे.

लातूर एम.आय.डी.सी. येथील भूखंडाचा वापर उद्योजकांनी व्यापार व निवासी प्रयोजनासाठी केल्याबाबत

(२७) २५५९५ (३१-०७-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर एम.आय.डी.सी. येथे औद्योगिक प्रयोजनाकरिता वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा वापर काही उद्योजकांनी व्यापार व निवासी प्रयोजनासाठी केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई व जिल्हाधिकारी लातूर यांचेकडे नागरिकांनी मगील दोन वर्षात दिलेल्या तक्रारीवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर एम.आय.डी.सी. मध्ये सन २०१० मध्ये औद्योगिक भुखंडाचा नियमबाह्यपणे वापर केल्याबद्दल दहा उद्योजकांना रु. १ कोटी ७५ लाख दंड करण्यात आला आहे, तसेच या प्रकरणी दंडात्मक कारवाई झालेल्यापैकी एकाही उद्याजकांने अद्याप एक रुपयासुध्दा दंड भरलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार लातूर औद्योगिक क्षेत्रामध्ये १५ भूखंडधारकांनी औद्योगिक प्रयोजनासाठी वाटप केलेल्या भूखंडावर वाणिज्य/निवासी वापर सुरु केला आहे त्यांना प्रादेशिक कार्यालय, लातूर यांच्यामार्फत नोटीसा बजावून दरातील फरकाची रक्कम महामंडळास अदा करण्यास कळविण्यात आलेले आहे.
(३) व (४) लातूर औद्योगिक क्षेत्रामध्ये ज्या भूखंडधारकांनी औद्योगिक प्रयोजनासाठी वाटप केलेल्या भूखंडाचा वापर वाणिज्य/निवासासाठी केलेला आहे, अशा १५ उद्योजकांना २,५८,२४,०००/- इतकी दंडाची रक्कम आकारण्यात आली असून त्यापैकी रु १६,०४,१००/- इतका रकमेचा भरणा उद्योजकांनी केलेला आहे. तसेच ज्या भूखंडधारकांनी दंडाची रक्कम महाराष्ट्र औद्योगिक महामंडळास अद्यापर्यंत अदा केलेली नाही, त्यांच्यावर MRTP Act मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाळुंज महानगर एमआयडीसी प्रशासन व ठेकेदारांच्या वादात बजाजनगरात बीओटी तत्वावर सुरु करण्यात आलेली ड्रेनेजलाईनची योजनाबाबत

(२८) २५८१८ (११-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळुंज महानगर एमआयडीसी (जि.औरंगाबाद) प्रशासन व ठेकेदारांच्या वादात बजाजनगरात बीओटी तत्वावर सुरु करण्यात आलेल्या साडेबारा कोटी रुपये खर्चाच्या ड्रेनेजलाईनची योजना प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही ड्रेनेजलाईनची योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मे.भारत उद्योग यांच्याकडून ड्रेनेजलाईनची योजना संदर्भात होत असलेली दिरंगाई पाहून महामंडळाने त्यांच्या विधी विभागाच्या सल्लयानुसार दिनांक २४/१२/२०१४ च्या पत्रान्वये काम काढून घेण्याची नोटीस मे.भारत उद्योग यांना देण्यात आली आहे. त्याविरोधात भारत उद्योग लि. यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ५२/२०१५ ही दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे महामंडळाच्या विधी विभागाचे अभिप्राय घेऊन उर्वरित कामाची निविदा तातडीने मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोहने (जि.ठाणे) येथील आश्रमशाळा मोरोची गाव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे स्थलांतरीत न करण्याबाबत

(२९) २५९५४ (३०-०७-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नवी मुंबई, भिवंडी, ठाणे, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, वसई, भाईदर परिसरात राहणा-या भटक्या-विमुक्त मुलांचे पहिली ते दहावीपर्यंत शालेय शिक्षण पूर्ण करणारी कल्याणजवळील मोहने (जि.ठाणे) येथील एकमेव आश्रमशाळा सोलापूरमधील माळशीरस तालुक्यातील मोरोची गाव येथे स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाला पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील आश्रमशाळा स्थलांतरीत होऊ नये याकरीता शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१८-०१-२०१६) : (१) होय. मोहने (जि.ठाणे) येथील विजाभज आश्रमशाळा शासन निर्णय दि.३० ऑगस्ट, २०१४ अन्वये मोरची, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथे स्थलांतरीत करण्यात येत असल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले.

(२) होय.

(३) उपरोक्त आश्रमशाळेच्या स्थलांतरांच्या आदेशास, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थगिती दिलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बोगस विद्यार्थ्यांच्या नावांवर शिष्यवृत्ती जमा केलेल्या रकमेचा अपहार झाल्याबाबत

(३०) २६८९३ (३०-०७-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडून बोगस विद्यार्थ्यांच्या नावांवर जमा केलेल्या शिष्यवृत्ती अपहाराच्या रकमेचा आकडा आता २८ कोटी रुपयांवर पोहचला आहे तसेच संपूर्ण राज्य शिष्यवृत्तीची रक्कम जमा करणारी एकच कंपनी असल्याने इतर जिल्ह्यात अशाच प्रकारचा गैरव्यवहार झाल्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्वतंत्रपणे चौकशी करण्यासाठी समाजकल्याण विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखालील तीन जणांची समिती नियुक्त करण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी समिती नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०१-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्यात मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी/परीक्षा फी या योजनांमध्ये झालेली अनियमितता/गैरप्रकार यांना प्रतिबंध करुन सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी दिनांक ३/७/२०१५ च्या आदेशान्वये संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथकाची निर्मिती केली आहे. तसेच, मुख्यालय स्तरावर अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा मतदार संघातील एम.आय.डी.सी.ने जमीन
अधिग्रहन संबंधित निवेदन दिल्याबाबत

(३१) २६९४७ (०६-०८-२०१५). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा मतदार संघातील एम.आय.डी.सी.ने जमीन अधिग्रहन प्रश्नासंबंधि निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एम.आय.डी.सी. नेवासा मधील मौजे शिंगवे, तुकाई, झापवाडी, वाघवाडी, घोडेगाव यांनी जमीन अधिग्रहनाचे पैसे स्विकारले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांच्या वाढीव मोबदल्याची मागणी मा.उद्योग मंत्री यांना केली, हे खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई व लोहगाव येथील २७२.५३ हे.आर क्षेत्राच्या औद्योगिक भूसंपादनांकरिता उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना एकूण रु.८४,८५,१४१/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम वाटपासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती त्यानुसार भूसंपादन अधिकारी यांच्यामार्फत संबंधीत शेतकऱ्यांना सदर रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.
(३) व (४) उपविभागीय अधिकाऱ्यांनी सदर क्षेत्रासाठी वाटप केलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेवर संबंधित शेतकऱ्यांनी नाराज होऊन त्यांनी वाढीव नुकसान भरपाई मिळण्याकरिता १४१ दावे न्यायालयात दाखल केले होते. त्यावर मा. न्यायालयाने दिनांक ३०/४/२०१२ रोजी दिलेला न्यायनिर्णयानुसार एकूण रु.२,०४,६२,७८०/-इतकी रक्कम मा.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर,

नेवासा यांच्या न्यायालयात जमा करण्यात आली आहे. तसेच आणखी काही संबंधित शेतकऱ्यांनी वाढीव नुकसान भरपाई मिळण्याकरिता १४ दावे दाखल केल्याच्या अनुषंगाने न्यायनिर्णयानुसार एकूण रु.१२,२३,६४८/- इतकी रक्कम मा.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, अहमदनगर यांच्या न्यायालयात जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दिली जाणारी अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

(३२) २७१७० (३०-०७-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शासनातर्फे दिली जाणारी अनुदानाची रक्कम मगील दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदान प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत, तसेच मागील दोन वर्षामध्ये अनूसूचित जातीच्या पात्र विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना अनूदानाची रक्कम देण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२२-०१-२०१६) : (१) व (२) राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी दिली जाणारी अनुदानाची अनुज्ञेय रक्कम प्रलंबित नाही. परदेशी शिष्यवृत्ती योजनेतंर्गत मागील दोन वर्षामध्ये एकूण १४४ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला असून त्याकरीता रु.२६.२२ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्गालगत (NH-६) (जिल्हा अकोला) येथील बीज एम.आय.डी.सी रस्त्यालगत अतिक्रमण झाल्याबाबत

(३३) २८१६२ (३१-१०-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गालगत (NH-६) (जिल्हा अकोला) येथील बीज प्रमाणीकरण यंत्रणा कार्यालयासमोरील एम.आय.डी.सी.कडे जाणाऱ्या रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतुक रहदारीस अडथळा निर्माण झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमण दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे तसेच सदर अतिक्रमण होत असतांना दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे. राष्ट्रीय महामार्ग (NH-६) लगत जि. अकोला येथील बीज प्रमाणीकरण कार्यालयासमोरील एमआयडीसीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात हळूहळू होत असते.

(२) बीज प्रमाणीकरण यंत्रणा कार्यालयासमोर ४० ते ५० वर्षापासून झोपडपट्टीचे अतिक्रमण आहे.महामंडळातर्फे अतिक्रमण होऊ नये म्हणून संबंधितांना वारंवार सूचना देण्यात येतात. यापूर्वी दिनांक २९/०३/२०११ रोजी उपअभियंता, अकोला यांनी पोलीस बंदोबस्तात औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीतील अतिक्रमण काढले आहे. तसेच भविष्यात अतिक्रमण होऊ नये म्हणून रस्त्याच्या कडेने जाळीचे कुंपण घालून वृक्षारोपण करुन सुशोभिकरण करण्यात आले असून अतिक्रमण होऊ नये म्हणून दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत अखर्चित निधी खर्च करण्याच्या प्रस्तावाबाबत

(३४) २८१६९ (३१-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, (जि.प. उस्मानाबाद) यांनी आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्या मार्फत सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात रुपये ९६,००,०००/- एवढया निधीतील अखर्चित निधी खर्च करण्याचा प्रस्ताव माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देऊन उर्वरित कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येतील,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०२-०२-२०१६) : (१) होय.

(२), (३) व (४) याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे कडून या विभागाच्या दिनांक ८/९/२०१५ च्या पत्रान्वये फेर प्रस्ताव मागविलेला आहे. तो प्राप्त झाल्यावर उचित निर्णय घेण्यात येईल.

उस्मानाबाद येथील विमानतळावरील सुविधांबाबत

(३५) २८१९१ (०५-११-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद येथील विमानतळाची देखभाल व दुरुस्ती रिलायन्स कंपनीला करारावर देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करारानुसार कंपनीने विमानतळ व धावपट्टीवर कोणत्या सुविधा पुरविल्या आहेत,
(३) असल्यास, उर्वरित सुविधा केव्हापर्यंत देण्यात येतील,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे. उस्मानाबाद येथील विमानतळ, मे.रिलायन्स कंपनी अंतर्गत असलेल्या मे.उस्मानाबाद एअरपोर्ट प्रा.लि.यांना महामंडळाने दिनांक ३/११/२००९ रोजी करारनामा करुन हस्तांतरीत केला आहे.
(२) व (३) करारनाम्यातील अटीनुसार Non-Airport Activity तरतुदींनुसार फ्लाईंग ॲकॅडमी उभारण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सदर ॲकॅडमीमार्फत पायलट प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच विमानतळावर खाजगी सुरक्षा व्यवस्था देण्यात आली आहे.करारनाम्यातील प्रकल्प व्याप्ती नुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरण/ भारत सरकार तसेच नागरी उड्डायन मंत्रालय यांच्या मानकाप्रमाणे शासनाच्या व महामंडळाच्या नियमांच्या अधीन राहून मागणी व क्षमतेप्रमाणे विमानतळाचा टप्प्या-टप्प्यात श्रेणीवाढ व विकास करण्यात येणार आहे. तसेच मागणीप्रमाणे कार्गो फ्लाईट ऑपरेशन, साठवण सुविधा, शीतगृह, आंतरराष्ट्रीय टर्मिनल, विमानतळाची देखभाल दुरुस्ती,तिकीट खिडकी, माहिती केंद्र, सामान तपासणीसाठी एक्स-रे मशीन, पोलीस मदत अशा प्रकारच्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत. महामंडळासोबत झालेल्या करारनाम्यातील प्रकल्प व्याप्तीनुसार मे.उस्मानाबाद एअरपोर्ट प्रा.लि.कंपनीने मागणी व क्षमतेप्रमाणे उर्वरित सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उद्योग उभारण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या इस ऑफ डुईंग बिजनेस अंतर्गत एकाच ठिकाणी सात दिवसांच्या आत देण्याबाबत

(३६) २८३९५ (२२-१२-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उद्योग उभारण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या इस ऑफ डुईंग बिजनेस अंतर्गत एकाच ठिकाणी सात दिवसांच्या आत देण्याबाबत आवश्यक उपाययोजना २ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी १८ सप्टेंबर २०१५ वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२२-०१-२०१६) : (१) राज्यात उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवाने/नाहरकती/मंजूऱ्या कमी करुन त्याकरीता लागणारा कालावधी कमी करण्यासाठी "मेक इन महाराष्ट्र" व "ईज ऑफ डुईंग बिझनेस" या उपक्रमामार्फत राज्य शासन प्रयत्नशील आहे. "ईज ऑफ डुईंग बिझनेस" या उपक्रमा अंतर्गत उद्योगांना ज्या ना हरकती/परवाने आवश्यक आहेत ते एकाच ठिकाणी व सुलभ रित्या प्राप्त होण्याकरीता एक खिडकी योजना राबविण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. सदर एक खिडकी योजनेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) एक खिडकी योजनेचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेसर्स सोना बेकर्स (ता. निफाड , जि. नाशिक) यांना विंचूर एम आय डी सी येथे बेकरी उद्योगाकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(३७) २८८९८ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेसर्स सोना बेकर्स (ता. निफाड, जि. नाशिक) यांना विंचूर एम आय डी सी येथे बेकरी उद्योगाकरिता १ एकर जागा उपलब्ध होणेबाबत स्थानीक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी शासनाकडे दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी पत्र लिहून मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मेसर्स सोना बेकर्स यांचा १ एकर जागा मागणी संबंधीचा अर्ज दिनांक ४/८/२०१५ रोजी महामंडळास प्राप्त झाला असून सदर अर्ज स्थानिक भूखंड वाटप समितीसमोर ठेवण्यात आला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कौडगाव (ता. जि. उस्मानाबाद) येथील M.I.D.C. मध्ये अमरावतीच्या धरतीवर उद्योग आकर्षित करण्यासाठी कार्यवाही करणेबाबत

(३८) २९२०७ (२२-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कौडगाव (ता. जि. उस्मानाबाद) येथील M.I.D.C. च्या माध्यमातून जागा संपादित करून तेथे २५०० एकरावर औद्योगिक क्षेत्र प्रस्थापित करण्याचे काम चालू आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सध्यस्थितीत टप्पा क्रमांक ३ मध्ये किती जागा संपादित करण्यात आली आहे
(३) असल्यास, M.I.D.C. कौडगाव येथे उद्योग उभारणीसाठी जागेच्या मागणीचे किती प्रस्ताव आलेलेल आहेत,
(४) असल्यास, मागणीचा एकही प्रस्ताव आला नसल्यास अमरावतीच्या धरतीवर उद्योग आकर्षित करण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अतिरिक्त कौडगाव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.३ करिता खाजगी व सरकारी अशी एकूण ४०६.३७ हे.आर क्षेत्राची अधिसूचना दिनांक १३/१२/२०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्यापैकी संयुक्त मोजणी झालेले व संमती प्राप्त ३८४.२५ हे.आर क्षेत्रापैकी ३७३.३१ हे.आर क्षेत्र महामंडळाच्या ताब्यात आलेले आहे.
(३) कौडगाव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.१ मध्ये उद्योग उभारणीसाठी भूखंडाचे एकूण ८ प्रस्ताव प्राप्त झाले.
(४) कौडगाव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ व ३ साठी उर्वरित क्षेत्र ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु असून क्षेत्र ताब्यात आल्यानंतर विकास कामे पूर्ण करुन भूखंडांचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (बार्टी) पुण्यालगत नवीन प्रशासकीय इमारत आणि संकूल बांधण्याबाबत

(३९) २९५१८ (२३-१२-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (बार्टी) पुण्यालगत नवीन प्रशासकीय इमारत आणि संकूल बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले (०२-०२-२०१६) : (१) व (२) या विभागाच्या दिनांक ९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेसाठी पुणे / पुणे शहर लगतच्या परिसरात नवीन इमारत व संकुल निर्माण करण्याचा

निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये प्रशासकीय इमारत, ऑडिटोरियम, वर्ग खोल्या, वाचनालय, खेळाची सोय, अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थान, वसतीगृह, गेस्ट हाऊस, गार्डन, सोलर सिस्टीम इत्यादींची व्यवस्था करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात संजय गांधी योजनेतील निराधारांना गत पाच महिन्यापासून निराधार योजनेचे पैसे मिळाले नसल्याबाबत

(४०) ३०५९१ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात पात्र असलेल्या संजय गांधी योजनेतील निराधारांना गत पाच महिन्यापासून निराधार योजनेचे पैसे देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) सदर योजनेसाठी मोठ्या प्रमाणात अपात्र ठरविल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व निराधारांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पात्र निराधारची थकीत पेन्शन देणेबाबत तसेच अपात्र लाभार्थ्यांना निराधार योजनेत सामावून घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१६-०३-२०१६) : (१) हे खरे नाही. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे माहे डिसेंबर, २०१५ चे अनुदान वाटप पूर्ण झालेले असून माहे जानेवारी, २०१६ च्या अनुदान वाटपाची कार्यवाही चालू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दि.२२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या निवेदनान्वये नमुद केलेल्या बाबीनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात अनुदान वितरीत करण्याच्या सूचना सर्व तहसिल कार्यालयाला देण्यात आलेल्या आहेत.

ब) विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अर्थसहाय्यात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

क) संजय गांधी योजना समितीची बैठक आयोजित करुन तहसिलस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याबाबतच्या सूचना सर्व तहसिल कार्यालयाला देण्यात आलेल्या आहेत.

ड) अपात्र लाभार्थी शोध मोहिमेअंतर्गत १८०१९ लाभार्थ्यांची सुनावणी घेण्यात आली, त्यानुसार प्रस्तुत सुनावणीमध्ये १३,५८० लाभार्थी अपात्र असल्याचे आढळले व ४,२४४ लाभार्थी पात्र ठरले आहेत. अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या अपात्रतेची कारणमिमांसा कळवून त्यांचा लाभ बंद करण्यात आलेला आहे आणि पात्र लाभार्थ्यांचे अनुदान वितरीत केले आहे/ अनुदान वितरणांची कार्यवाही सुरु आहे.

इ) कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, गडहिंग्लज, आजरा, इचलकरंजी शहर व हातकणंगले या तालुक्यात संजय गांधी योजना समित्या गठीत केलेल्या असून उर्वरित तालुक्यातील समित्या गठीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या वतीने सुतगिरणी अर्थसहाय्य निवडीत विदर्भाला डावलण्यात आलेबाबत

(४१) ३२५०० (२२-१२-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या वतीने सुतगिरणी अर्थसहाय्य निवडीत राज्यातील १४ सुत गिरण्यांची निवड करण्यात आली. यामध्ये पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील सुत गिरण्यांचा समावेश असून यातून विदर्भाला डावलण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अर्थसहाय्य करण्यासाठी तीन सहकारी सुत गिरण्याची निवड मंत्री मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील एक ही सुत गिरणीचा समावेश यामध्ये करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाचे सर्वसाधारण धोरण काय,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

शासनाने सन २०१५-२०१६ या वर्षात राज्यातील एकूण ६ सहकारी सूतगिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड केली आहे. यामध्ये ४ सहकारी सूतगिरण्या मराठवाड्यातील असून एक उत्तर महाराष्ट्रातील व १ विदर्भातील सहकारी सूतगिरणीचा समावेश आहे.

(२) शासन निर्णय दि.१८/११/२०१५ नुसार ५ मागासवर्गीय प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांचा बाराव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दि.१५/२/२०१६ अन्वये विदर्भातील १ सर्वसाधारण सहकारी सूतगिरणीचा बाराव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) विदर्भातील एकही सुत गिरणीचा समावेश यामध्ये करण्यात आला नाही, हे खरे नाही.

शासन निर्णय दि.२/१/२०१२ अन्वये राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहिर करण्यात आले आहे. सदर धोरणात खालीलप्रमाणे तरतूद आहे :-

अ) विदर्भ/मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांना सध्याच्या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्याची योजना यापुढेही चालू राहील. (५:४५:५०)

ब) ज्या तालुक्यात सहकारी तत्वावरील सूत गिरण्यांना यापूर्वी शासनाकडून भागभांडवल स्वरुपात मदत करण्यात आलेली आहे अशा तालुक्यात सहकारी तत्वावरील नवीन सूत गिरणी उभारण्यास ५:४५:५० या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येणार नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात ६६ भूखंडावर उद्योग उभारणी झालेली नसलेबाबत

(४२) ३२६९५ (२२-१२-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण ७५३ भूखंडापैकी ६६ भूखंडावर उद्योग उभारणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे भूखंड काही उद्योजकांनी अडवून ठेवले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे अडवून ठेवलेले भूखंड ताब्यात घेऊन गरजू उद्योजकांना देण्यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उद्योग उभारणी न झालेल्या भूखंडाचा विहीत केलेला विकास कालावधी अद्याप पूर्ण झालेला नाही.

(३) व (४) औद्योगिक क्षेत्रातील ज्या भूखंड धारकांनी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भूखंडाचा विहीत कालावधी संपुष्टात येऊनही भूखंड विकसित केलेला नाही अशा एकूण १७९ उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या असून जवळपास १३० भूखंड परत ताब्यात घेण्याची महामंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.

खामगाव जि. बुलडाणा येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील भूखंड मिळण्याकरीता ऑफ लाईन पद्धतीने अर्ज स्विकारत नसल्याबाबत

(४३) ३३२८२ (२२-१२-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव जि. बुलडाणा येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील भूखंड मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा दिनांक १५ सप्टेंबर २०१५ रोजी पासून स्थगित करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑन लाईन पद्धत बंद झाल्यापासून ऑफ लाईन अर्ज विभागीय कार्यालय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अमरावती हे स्वीकारत नाही, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, अर्ज न स्वीकारण्याची कारणे काय,

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक १५/९/२०१५ पासून महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंड मागणीसंदर्भात ऑनलाईनद्वारे अर्ज करण्याची सुविधा स्थगित केली आहे.

(२) हे खरे नाही.

महामंडळाने ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा स्थगित ठेवल्यामुळे ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूरामधील अक्कलकोट रस्त्यावरील एमआयडीसीत जागा शिल्लक नसल्याने नव्या उद्योगासाठी कुंभारीतील जागेचे भुसंपादन करण्याबाबत

(४४) ३३३६८ (२२-१२-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरामधील अक्कलकोट रस्त्यावरील एमआयडीसीत सध्या जागा शिल्लक नसल्याने नव्या उद्योगासाठी कुंभारी येथील जागेची पाहणी करुन भूसंपादन करु अशी माहिती औद्योगिक विकास महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर एमआयडीसी मध्ये जागा शिल्लक नसल्याने इच्छूक उद्योजकांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नवीन औद्योगिक क्षेत्राकरिता मौजे कुंभारी व कर्देहळ्ळी ता.दक्षिण सोलापूर येथील जागेची पहाणी करुन प्राथमिक स्तरावर भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि ग्रामपंचायत कुंभारी व कर्देहळ्ळी त्याचप्रमाणे स्थानिक शेतकऱ्यांनी सदर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास विरोध दर्शविला आहे. तसेच पाटबंधारे विभागाकडे पाण्याचे आरक्षण प्राप्त होण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असून संबंधित शेतकऱ्यांची भूसंपादनास संमती प्राप्त झाल्यानंतर सदर क्षेत्र स्थापन करण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कापूस उत्पादक शेतकरी कमी दराने व्यापाऱ्यांना
कापूस विक्री करीत असल्याबाबत

(४५) ३३८८३ (२२-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी नैसर्गिक व दुष्काळी परिस्थितीमुळे हतबल झाल्याने तसेच शासनाने कापूस खरेदी केंद्र सुरु न केल्याने शेतकरी कमी दराने व्यापाऱ्यांना कापूस विक्री करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) कापूस उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी खरेदीदारांकडून पिळवणूक होऊ नये, म्हणून शासनाने किमान एकेचाळीसशे रुपये प्रती क्विंटल हमी भाव तातडीने जाहिर करावा अशी मागणी अकोला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन उक्त मागणीबाबत काय निर्णय घेणार आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.
हंगाम २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे सीसीआयचे धोरणानुसार कापूस पणन महासंघ सीसीआयचे उप अभिकर्ता म्हणून किमान आधारभूत दराने दिनांक ५.११.२०१५ पासून राज्यात एकूण ८२ केंद्रावंर कापूस खरेदी करण्यात येत आहे.
(२) कापूस उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून पिळवणूक होवू नये म्हणून शासन राज्यात किमान आधारभूत दराने कापूस खरेदीचे कामकाज करीत आहे. केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या दि. २० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ राज्यात सीसीआयचे उपअभिकर्ता म्हणून रु.४१०० प्रति क्विंटल या दाराने हंगाम २०१५-१६ मध्ये कापूस खरेदी करित असून दिनांक २०.१.२०१६ अखेर महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महसंघाने २५०४१७ क्विंटल इतका कापूस रु. ४१०० प्रति क्विंटल या दराने खरेदी केला आहे.
(३) राज्यात २९ एम.एम. आणि त्यावरील दर्जाच्या कापसाचे हमी दर रु.४१००/- इतका आहे.

मोहदा (ता.केळापूर,जि.यवतमाळ) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय पांढरकवडा मार्फत आदिवासी बांधवाना वाटप करण्यात येणारे ४० थ्रेशर मशीन वाटपाबाबत

(४६) ३४७७१ (२३-१२-२०१५). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहदा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय पांढरकवडा मार्फत आदिवासी बांधवाना वाटप करण्यात येणारे ४० थ्रेशर मशीन वाटप न केल्यामुळे अंतरगाव येथील शाळेत जंग लागून निकामी झाल्याचे दिनांक १९ जून, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयामार्फत अनेक योजना आदिवासी बांधवाचा विकास व्हावा म्हणून राबविल्या जातात परंतु योजना त्यांच्या पर्यंत पोहचत नाहीत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, आदिवासी बांधवापर्यंत योजना पोहचविण्यास दिरंगाई करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०९-०६-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर साहित्याचा पुरवठा श्री.भागवत सैंदाणे (तत्कलीन प्रकल्प अधिकारी) यांच्या कालावधीतील असून सदर साहित्य व इतर साहित्याबाबत तक्रार झाली होती. त्या अनुषंगाने अपर आयुक्त, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र.२७३७, दि.१८.०५.२००९ अन्वये एफ.आय.आर क्र. ९५/४११०९ दिनांक ०४/०८/२००९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

फुलेनगर (ता. नांदगाव, जि.नाशिक) येथील भटक्या विमुक्त जातींसाठी असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या कामाबाबत

(४७) ३६४९२ (२३-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्यातील फुलेनगर या गावी भटक्या विमुक्त जातींसाठी असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या प्रकल्पास सन २०१२-१३ या वर्षाअंतर्गत सामाजिक न्याय विभागाने या प्रकल्पास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अद्यापही या प्रकल्पाचे काम सुरू होणेबाबत संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय, सदर प्रकल्पाचे काम सुरु न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उपरोक्त प्रकल्पाचे कामास गती देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२०-०२-२०१६) : (१) नाही.
(२) यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना फुलेनगर नांदगाव जि.नाशिक या प्रकल्पास सन २०१२-१३ मध्ये मंजुरी देण्यात आलेली नसून सदर वसाहतीचा प्रस्ताव प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण नाशिक विभागाने शिफारस करुन विजाभज संचालनालयास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासोबत शासन निर्णय दि.२७/१२/२०११ मध्ये नमुद करण्यात आलेल्या कागदापत्रांची पूर्तता नसल्याने संचालनालयामार्फत पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर कागदपत्रांची पूर्तता करुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वडार समाज जात पडताळणीबाबत

(४८) ३६५२० (२३-१२-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील वडार समाज हा रोजगाराच्या निमित्ताने भटकंती करीत असल्याने त्यांचेकडे तीन-चार पिढयांची माहिती सरकार दरबारी नसणे, तसेच जात पडताळणीसाठी ५० ते ६० वर्षांचा पुरावा या अटी घालण्यात आल्या आहेत, सदर अटी रद्द करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे वडार समाजाचे अध्यक्ष यांनी माहे ऑगस्ट २०१५ च्या दुस-या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२८-०१-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे, केवळ त्याच जातीतील समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जातप्रमाणपत्र देण्यात येते. सदर यादीतील विमुक्त जाती-अ या प्रवर्गात अ.क्र.१२ वर “वडार” या जाती समाजाचा समावेश आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर केल्यास त्यांना जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही. सदर नियमांनुसार विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, २१/११/१९६१ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्ती हया उदरनिर्वाहाकरिता भटकंती करत असल्याने त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सोयीचे व्हावे याकरिता ते ज्या ठिकाणी वास्तव्य करीत असतील त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने दिलेले प्रमाणपत्र एक पुरावा म्हणून ग्राहय धरण्याबाबतच्या सूचना दि.१/१०/२००८ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या असून यानुसार कार्यवाही करण्याबाबत पुन्हा दि.२२/०९/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे केलेल्या सहकारी संस्थाच्या सर्व्हेक्षणानुसार बोगस सहकारी संस्थेविरूध्द कारवाई करणेबाबत

(४९) ३८३८३ (२२-१२-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी सहकार खात्यामध्ये नविन पॅटर्न राबविण्याची संकल्पना मांडली ही बाब खरी आहे काय, असल्यास कोणती,

(२) सहकार खात्याच्या आदेशानुसार सहकारी जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे संस्थचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण काम झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास त्यानुसार परभणी जिल्हयात सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्वेक्षणात किती संस्था अस्तित्वात आहेत तसेच किती संस्था बंद असल्याचे आढळून आले आहे, या चौकशीत आणखी कोणत्या बाबी निदर्शनास आल्या आहेत,

(५) असल्यास, या सर्व्हेक्षणानुसार बोगस सहकारी संस्थावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) : (१) नाही. सहकार आयुक्त यांचेकडील परिपत्रक दिनांक १७ जून, २०१५ नुसार सर्व सहकरी संस्थांचे सर्वेक्षण करणे बाबत विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) परभणी जिल्हयात २३९१ सहकारी संस्था नोंदणीकृत आहे. त्यापैकी ८१३ सहकारी संस्था सर्वेक्षण मोहिमेमध्ये बंद/कार्यस्थगीत/ठावठिकाणा नसल्याचे आढळून आले आहे.

(५) सर्वेक्षण मोहिमेमध्ये बंद/कार्यस्थगीत/ठावठिकाणा नसल्याचे आढळून आलेल्या सहकारी संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१ खाली १७६ संस्था नोंदणी रद्द केल्या व ७८ संस्थांचे अंतरिम आदेश मागे घेण्यात आले आहेत. तसेच कलम १०२ व कलम १०३ नुसार ५१२ संस्थांवर अवसायन कार्यवाही करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठीचे धोरण अद्याप पुणे शहर व जिल्ह्यात राबवले जात नसल्याबाबत

(५०) ४८१८७ (२८-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी ज्येष्ठांसाठीचे धोरण बनवण्यात आले मात्र, बराच कालावधी लोटला तरीही अद्याप पुणे शहर व जिल्ह्यात राबवले जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१६) : (१), (२) व (३) नाही. हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक २९/९/२०१० च्या अधिसुचनेन्वये पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक उप विभागासाठी न्यायाधिकरण स्थापना करण्यात आले असून दिनांक १७/०८/२०११ च्या आदेशानुसार पुणे जिल्ह्यासाठी सहा. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची निर्वाह अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक विभागासाठी उपविभागीय अधिकारी यांची अपिलीची अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.